


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २११
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.१३ मार्च २०२५


## थोडक्यात

### पाणी पेटले! हजारो ग्रामस्थांचे बेहाल...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, बुलडाणा :** मार्च महिन्याच्या मध्यावर पाणी टंचाईने गंभीर स्वरूप धारण केले असून हजारो ग्रामस्थांची तहान टँकर आणि अधिग्रहित खाजगी विहिरीद्वारे करण्यात पाणी पुरवठ्या द्वारे भागविली जात आहे. यावर कळस म्हणजे केंद्रीय आयुष कुटुंबं कल्याण,आरोग्य राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांच्या गृहक्षेत्रात अर्थात मेहकर विधानसभा मतदारसंघात पाणी पेटल्याची चिन्हे आहे. मागील वर्षीच्या पावसाळ्यात समाधानकारक पाऊस झाला असतानाही यंदा मार्च महिन्याच्या प्रारंभीच पाणी टंचाईने डोके वर काढले. अधिग्रहित खाजगी विहिरीद्वारे पाणी पुरवठ्याचे दुष्टचक्र सुरु झाले आहे हजारो गावकऱ्यांची तहान या विहीर भागवीत आहे. जिल्ह्यातील दुर्गम आणि जलस्रोत नसलेल्या गावातील रहिवासी प्रामुख्याने आया बहिणींची घडाभर पाण्यासाठी कैक मेल भटकंती सुरु झाली आहे. मार्चच्या पहिल्या आठवड्यातच आठ गावांना खाजगी अधिग्रहित विहिरीद्वारे पाणी पुरवठा सुरु झाला. मात्र आठ दिवसातच खाजगी विहिरीद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठ्याची तीव्रता चारपटीने वाढली आहे. सध्या जिल्ह्यातील ६ तालुक्यातील ३७ गावांना ४२ खाजगी अधिग्रहित विहिरीद्वारे पाणी पुरवठा होत आहे.

**मेहकरात जास्त तीव्रता !**

तसेच मार्चच्या दुसऱ्या आठवड्यातच जिल्ह्यात टँकरची धडधड सुरु झाली आहे. चार गावात टँकरने पाणी पुरवठा सुरु झाला आहे. केंद्रीय राज्य मंत्री यांच्या गृह मतदारसंघातील मेहकर तालुक्यातील हिवरा साबळे, पारडी, जवळा आणि वरवंड या गावांना टँकरने पाणी पुरवठा होत आहे. याशिवाय मेहकर मतदारसंघातील २२ गावांना २२ खाजगी अधिग्रहित विहिरीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.मेहकर तालुक्यातील शेंदला, लवणा, मोळा, साबरा, खंडाला, उकळी, वरदडा, सुळा, खामखेड, अकोला ठाकरे, जयताळा, मोसंबेवाडी, पांगरखेड, रत्नापूर, सुकळी, पार्डी, जवळा, हिवरा साबळे, वरवंड आणि लोणार तालुक्यातील कौलखेड, शारा या गावांचा समावेश आहे. टँकर ग्रस्त गावांची लोकसंख्याच साडेसात हजार इतकी आहे. यापरिणामी मेहकर मतदारसंघातील कमी अधिक चाळीस हजार ग्रामस्थांची तहान टँकर व विहिरीद्वारे भागविली जात असल्याचे विदारक चित्र आहे. आताच अशी स्थिती तर मे जून मध्ये किती बिकट स्थिती राहणार हे स्पष्ट होते.

**देऊळगाव राजा मध्येही बिकट स्थिती**

जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातही टंचाईची तीव्रता जास्त असल्याचे चित्र आहे. या तालुक्यातील सहा गावांना अधिग्रहित खाजगी विहिरीद्वारे पाणी पुरवठा करावा लागत आहे. जास्त लोकसंख्येच्या अंढेरा गावासाठी चार खाजगी विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहे. यामुळे या गावाची तहान अधिग्रहित विहिरीद्वारेच भागवली जात आहे, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरणार नाही. याशिवाय याच तालुक्यातील डोड्रा, बोराखेडी बावरा, डिग्रस खुर्द,


बानेगाव, या गावांनाही खाजगी विहिरीद्वारे पाणी पुरविण्यात येत आहे. सिंदखेड राजा तालुक्यातील बुट्टा, डावरगाव, धंदरवाडी, उमरद, बाळ समुद्र, बुलढाणा तालुक्यातील रुईखेड टेकाळे, घाटनांद्रा, देवपूर, शेगाव तालुक्यातील जानोरी, या गावातील रहिवासियांना खाजगी विहिरीतून होणाऱ्या पाणी पुरवठ्या द्वारेच आपली तहान भागवावी लागत आहे.

## धक्कादायक ! आईसमोरच लहान भावाने विळ्याने चिरला मोठ्याचा गळा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नागपूर :** आईने थोरल्या मुलासोबत जेवन केले आणि घराबाहेर गप्पा करीत बसली. तेवढ्यात लहान मुलगा घरी आला. त्याला मोठ्या भावाने उशिरा येण्याचे कारण विचारले. त्याने उलटसुलट उत्तर देऊन टाळाटाळ केली. त्यामुळे भावाने रागावले आणि पटकन जेवन करुन झोपण्यास सांगितले.त्यामुळे चिडलेल्या भावाने मोठ्या भावाशी वाद घातला आणि घरातून विळा आणून आईसमोरच त्याचा गळा चिरला. पोटचा मुलगा क्षणार्धात रक्ताच्या थारोळ्यात पडून दिसल्यामुळे आईने हंबरडा फोडला आणि मदतीसाठी शेजाऱ्यांनी धाव घेतली.

मात्र, तोपर्यंत गंभीर जखमी युवकाने प्राण सोडला होता. अखेर




पोटच्या तरुण मुलाच्या आईच्या डोळ्यासमोरच श्वास थांबला. ही थरारक घटना कळमना पोलीस ठाण्याच्या हद्दीत मंगळवारी रात्री घडली. राजू कुंभलाल यादव (३०) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी आईच्या तक्रारीवरून मुलगा विजय यादव (२३) याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. गुलशननगर येथील रहिवासी रमा यादव (६०) यांना तीन मुले आणि एक मुलगी आहे. मुलगी शेजारीच राहाते. राजू हा मजुरी करायचा तर राजेश कळमना बाजारात मिरची व्यापाऱ्याकडे काम करतो. विजय हा वस्तीत फिरून टवाळक्या करतो. मंगळवारी रात्री सर्वजन घरी होते. आई जेवन करून नातीसोबत गप्पा मारत होती.राजू हा सुध्दा जेवन करून बसला होता. त्याच वेळी विजय घरी आला. राजूने त्याला जेवन करून घे, असे म्हटले. यावरून त्याने राजूला शिवीगाळ केली. अचानक तो सुडाने पेटला. मोठ मोठ्याने ओरडून तो शिवीगाळ करीत होता. यावरूनच दोन भावात वाद पेटला. वाद विकोपाला जाताच विजयने स्वयंपाक घरातून विळा आणला आणि राजूच्या छाती आणि डोक्यावर वार करून त्याला रक्तबंबाळ केले.

आईने आरडा ओरड केली तर नातीनही रडत घरी गेली. वडिलांना बोलावून आणले. जखमी अवस्थेत राजूला मेयो रूग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. माहिती मिळताच कळमना पोलिसांचे पथक मेयो रूग्णालयात पोहोचले. कुटुंबीयांचे जबाब नोंदवून तक्रारीवरून आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला. काही वेळातच आरोपी विजयला अटक केली. त्याला न्यायालयात उपस्थित करण्यात आले. शवविच्छेदनानंतर पार्थिव कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. या हत्याकांडानंतर नातेवाईकांची घरी गर्दी झाली. रमा या धाय मोकलून रडत होत्या. त्यांचा मोठा मुलगा मृत पावला तर लहान मुलगा कारागृहात जाणार होता. रमा यांना शेजारी राहणाऱ्या मुलीने स्वतःच्या घरी नेले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

## डोके, दोन हात व एक पाय नसलेला मृतदेह आढळल्यामुळे खळबळ...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील दाणेवाडी परिसरामध्ये मुंडके नसलेला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. यामुळे परिसरामध्ये खळबळ उडाली असून पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. याबाबत घडलेली घटना अशी की, श्रीगोंदा तालुक्यातील दाणेवाडी परिसरामध्ये वय अंदाजे २५ ते ३० वर्ष असलेला एका अज्ञात व्यक्तीचा, पुरुष जातीचा मृतदेह एका पोत्यामध्ये बांधून त्याच्यामध्ये दगड गोटे भरून तो विहिरीमध्ये टाकण्यात आला होता.

ही बाब आज लक्षात आली. यानंतर संबंधितांनी तात्काळ या प्रकरणी बेलवंडी




पोलिसांना याबाबत माहिती कळवली. माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. व विहिरी मधून मृतदेह वरती काढण्यात आला. या मृतदेहाला डोके नसून, दोन हात व एक पाय देखील तोडण्यात आल्याचे दिसून आले. या घटनेची माहिती मिळताच परिसरामधील नागरिकांनी घटनास्थळी पाहण्यासाठी गर्दी केली होती. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन रुग्णालयामध्ये शव विच्छेदनासाठी घेऊन गेले आहेत. अतिशय निर्दयपणे या युवकाचा खून करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. हा अनोळखी युवक कुठला आहे. या मृतदेहाची ओळख पटवण्याचे काम पोलीस विभागाकडून सुरू झाले आहे.त्याचा मृतदेह या ठिकाणी कसा आला. त्याचा खून करण्यात आला आहे का. याबाबत बेलवंडी पोलीस स्टेशनचे मारुती कोळपे हे पुढील तपास करीत आहे.

## महाजेनकोच्या जागेवर खापरखेडा वासियांना मिळणार हक्काचे खेळाचे मैदान

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१२, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील औद्योगिक शहर असलेल्या खापरखेडा परिसरात प्रतिभावंत खेळाडूंसाठी अधिकृत खेळाचे मैदान नाही, मागील अनेक वर्षांपासून खेळाचे मैदान उपलब्ध करून देण्याची मागणी प्रलंबित आहे.अखेर सावनेर विधानसभा मतदार संघाचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी पुढाकार घेऊन विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांची मुंबई येथे भेट घेतली व त्यांना निवेदन सादर केले.

बैठकीत खापरखेडा वासीयांसाठी खेळाचे मैदान उपलब्ध करून देण्याची मागणी केली. यावेळी सकारात्मक चर्चा झाली लवकरच खेळाचे मैदान उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आल्याने क्रीडाप्रेमी वर्गात आनंदाचे वातावरण आहे.

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांच्या अध्यक्षतेखाली १२ मार्च बुधवारला मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला आमदार डॉ.आशिष देशमुख यांच्यासह महानिर्मिती (संचलन) संचालक संजय मारुडकर, महानिर्मिती (प्रकल्प व कोल) संचालक अभय हरणे, महानिर्मिती संचलन -१ चे कार्यकारी संचालक राजेश पाटील, महानिर्मिती मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) कार्यकारी संचालक आनंद कौंत आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

खापरखेडा परिसरातील वेगवान गोलंदाज व विदर्भ एक्सप्रेस



या नावाने ओळखल्या जाणारा भारतीय क्रिकेटपटू उमेश यादव यांनी आपले नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर कोरले आहे, शिवाय खापरखेडा परिसरातील अनेक प्रतिभावंत खेळाडूंची राज्य व राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. मात्र, खापरखेडा परिसरात सराव करण्याकरिता एकही खेळाचे मैदान नाही, जेष्ठ नागरिकांसाठी मॉर्निंग वॉक नाही त्यामुळे खापरखेडा औष्णिक वीज केंद्राने भुईसपाट केलेल्या सात बिल्डिंग व रोपवे कॉलनीच्या जागेवर खेळाचे मैदान व मॉर्निंगवाक ट्रॅक तयार करण्याची आग्रही मागणी आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी दिलेल्या मागणी पत्रातून केली आहे.

त्याचप्रमाणे खापरखेडा मुख्य बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते परंतु या ठिकाणी बस स्थानक, स्वच्छतागृह, शौचालय नाहीत त्यामूळे सर्वसामान्य नागरिकांसह विशेषतः महिला वर्गाची गैरसोय होते. महाजेनकोच्या सीएसआर फंडातून महाजेनकोच्या जागेवर बसस्थानक, स्वछतागृह, शौचालय बांधून देण्याची मागणी करण्यात आली.

खापरखेडा मुख्यमार्गावर मटण व चिकन मार्केट आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो शिवाय अनेक अपघात झाले आहेत. त्यामुळे चिचोली आठवडी बाजारात मटण व चिकन मार्केट स्थलांतरित करावे शिवाय प्रशिक्षित, सुशिक्षित तसेच अशिक्षित बेरोजगार युवक युवतींना रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा आदी विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली.

## अतिक्रमण विभागाची नेरुळ व बेलापूर विभागात धडक मोहीम...

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि१२, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरुळ व बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नेरुळ विभागाअंतर्गत १) रविंद्र आर ठाकूर, एनएल-१/बी- ९१/३, से.१०, नेरूळ, व २) सुरज कोट, एनएल-१/बी-६/२, से.१०, नेरूळ, नवी मुंबई यांचे सदर कामी प्रत्यक्ष पहाणी केली असता अंदाजे ३.७० मी द ८.०० मी मोजमापाचे जी+३ आरसीसी अनधिकृत बांधकाम चालू असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर अनधिकृत बांधकामधारकांना अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नेरुळ विभाग कार्यालयाकडून दिलेल्या नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही.

त्यामुळे सदर अनधिकृत बांधकामावर नेरुळ विभाग कार्यालयामार्फत दि.०८ मार्च रोजी निष्कासन मोहिमेचे आयोजन करुन अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे. सदर



कारवाई सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी सागर मोरे, कनिष्ठ अभियंता संजय सोनटक्के व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, मजुर, ब्रेकर व गॅसकटरच्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक यांच्या मार्फत करण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील बेलापूर विभागाअंतर्गत १) अमोल तांडेल व इतर, घर क्र.२८४/००१, करावे गांव, से.३६ नवी मुंबई, २) गणेश आर. तांडेल व इतर, घर क्र.२७९/००५ पोतदार शाळेजवळ करावे गांव से.३६ नवी मुंबई व ३) रोहिणी पाटील घर क्र.२८४/२ करावे गाव सेक्टर ३६ नेरूळ यांचे अनधिकृत बांधकामास नोटीस बजाविण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने संबधितांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविने आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. सदर अनधिकृत बांधकामावर अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकामावर निष्कासित कारवाई करण्यात आली आहे.

# संपादकीय



## बांगलादेश आणि अस्थिरता...

बांगलादेशात लोकांच्या उठावाने शेख हसीना यांचे सरकार हटवले आणि मोहम्मद युनूस यांनी हंगामी सरकारचे प्रमुख सल्लागार म्हणून शपथ घेतली, या घटनाक्रमाला सात महिने पूर्ण झालेले असतानाही बांगलादेशात अस्थैर्यच दिसते आहे. एकंदर कायद्यांची ऐशीतैशी, अद्यापही होत राहिलेला हिंसाचार आणि रसातळाला चाललेली अर्थव्यवस्था ही सारी चिन्हे पाहून 'आगीतून फुफाट्यात' अशी आपल्या या शेजारी देशाची स्थिती अटळ असल्याचे लक्षात येते. युनूस हे स्वतःला 'प्रमुख सल्लागार' म्हणवत असले आणि लष्कराच्या हातात खरी सत्ता असली, तरी अंतर्गत हिंसाचार शमवून देशाचे गाडे रुळांवर आणण्याची जबाबदारी युनूस यांचीच आहे.झुंडशाहीला आळा घालण्यात युनूस यांना आलेले अपयश उघड दिसते. 'हिज्ब-उर- तहरीर' सारख्या संघटनेवर बंदी घालण्यात आली असली तरी या संघटनेचा हिंसाचार भररस्त्यांत सुरूच आहे. युनूस यांच्या 'सल्लागार मंडळा'त गृह खात्याचे काम पाहाणारा तरुणच या संघटनेचा कार्यकर्ता आहे म्हणतात. या संघटनेला इतर इस्लामी आक्रस्ताळ्या संघटनांची साथ आहेच. या देशात गृह खाते सांभाळणाऱ्या महफूज आलम ने डिसेंबरमध्ये 'पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतातल्या राज्यांचा काही भाग बांगलादेशाला जोडावा' अशा अर्थाचा मजकूर समाजमाध्यमांवर लिहिला आणि मग, भारताने आक्षेप नोंदवल्यावर तो स्वतःच काढून टाकला; पण मधल्या काळात आपणच कसे खरे बांगलादेशी राष्ट्रवादी, हे तेथील लोकांना दाखवण्याचा त्याचा हेतू साध्य झाला. ज्या विद्यार्थ्यांनी इथल्या असंतोषाला पहिल्यांदा वाचा फोडली होती, त्यांनी आता 'जातीयो नागोरिक पार्टी' (बंगाली भाषेत जातीयो म्हणजे सार्वत्रिक, राष्ट्रीय या अर्थाने) स्थापन केली आहे आणि तिचे काम करण्यासाठी युनूस यांच्या सल्लागार- सहकाऱ्यांपैकी एका सहकाऱ्या या सत्ताधारी मंडळाचा राजीनामा अलीकडे दिलेला आहे. या पक्षाचे ध्येय म्हणजे नवीन संविधान स्वीकारणे आणि 'संवैधानिक हुकूमशाही' विरुद्ध भक्कम लढा उभारणे. प्रशासनाच्या राजकीय चौकटीला आकार देण्याचे आणि नवीन बांगलादेश बांधण्याचे त्यांचे वचन हे राजकीय भाषणबाजीत आणखी एक भर घालणारे आहे. युनूस यांनी या पक्षाला चालना देण्यात भूमिका बजावल्याचे वृत्त आहे. अशांततेतून जन्मलेल्या अशा पक्षांना यश मिळू शकले नाही, याचा इतिहास साक्षीदार आहे. युनूस हे काही लोकप्रियतेच्या लाटेवरचे नेते नाहीत. त्यांना राष्ट्रीय सरकारचे नेतृत्व करण्याचा अनुभवही नाही; पण २००६ मध्ये (बांगलादेशात 'ग्रामीण बँके'मार्फत सूक्ष्मबचतीचा योग्यरीत्या प्रसार केल्याबद्दल) नोबेल शांतता पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांनी राजकीय महत्त्वाकांक्षा जोपासल्या आहेत, हे सर्वज्ञात आहे. युनूस यांनी २००७ मध्ये, लष्कराच्या पाठिंब्याने काम करणाऱ्या काळजीवाहू सरकारच्या काळात, 'प्रामाणिक राजकारण्यांना आकर्षित करण्यासाठी' आणि 'बांगलादेशच्या राजकीय संस्कृतीत सुधारणा करण्यासाठी' अशी उद्दिष्टे ठेवून 'नागरिक शक्ती' हा राजकीय पक्ष स्थापन केला होता. पण फारसा पाठिंबा न मिळाल्याने हा पक्ष बंद पडला. २००७-२०१० पर्यंत भारताचे उच्चायुक्त म्हणून मला लष्कराच्या पाठिंब्याने काम करणाऱ्या काळजीवाहू सरकारशी संवाद साधावा लागला. मी युनूस यांना काही वेळा भेटलो आणि त्यांच्या राजकीय पक्षाबद्दल विचारपूस केली. त्यांना खात्री होती की बांगलादेशला एक नवीन, प्रामाणिक राजकीय संस्कृतीची आवश्यकता आहे, आणि 'भ्रष्ट' मुख्य प्रवाहातील पक्ष हे काम करण्यास असमर्थ आहेत. परंतु आज 'सरकारच्या सल्लागार मंडळा'चे प्रमुख म्हणून, युनूस हिंसाचार रोखण्यात अपयशी ठरले आहेत. हिंसाचाराला 'वैध' म्हणून झुंडशाहीची भलामण केल्याबद्दल आणि अल्पसंख्याक-विरोधी हिंसाचार हा 'सांप्रदायिक' नसून 'राजकीय' आहे, असा विचित्र युक्तिवाद केल्याबद्दल युनूस यांच्यावर टीका झाली आहे. इस्लामवाद्यांना सरकारी यंत्रणांना संस्थांवर कब्जा करण्यासाठी आणि शेख हसीना सरकारच्या नियुक्त्या निष्प्रभ करण्यासाठी युनूस यांनीच मोकळीक दिल्याचा आरोप त्यांचे विरोध करू लागले आहेत. वाढत्या महागाईशी झुंजणाऱ्या बांगलादेशी लोकांमध्ये हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे निराशा वाढली आहे. हिंसाचारामुळे शेकडो कारखाने बंद पडले आहेत, गुंतवणूक कमी झाली आहे, कर्जवितरणाचे प्रमाण कमी झाले आहे आणि रोजगारसंधी रोडावल्याच आहेत. युनूस यांच्या नेतृत्वाखालील सल्लागार मंडळाने सत्तांतराला 'क्रांती' आणि 'नवीन मुक्ती' वगैरे कितीही म्हटले तरी, या तथाकथित शब्दांचा बुडबुडा आता फुटू लागला आहे. लोकांचा संयम सुटत चालला आहे.अशा वेळी अलीकडेच जाहीर निवेदन करून बांगलादेशच्या लष्करप्रमुखांनी इशारा दिला की अंतर्गत संघर्ष आणि हिंसाचार थांबला पाहिजे, कारण त्यामुळे देशाच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण झाला आहे.

# बंधुभाव व एकतेचे प्रतिक म्हणजे - होळी

प्राचीन भारतात होळी हा रंग, प्रेम आणि वसंत ऋतूचा सण म्हणून साजरा केला जाणारा लोकप्रिय आणि महत्त्वाचा हिंदू सण आहे. वसंत ऋतुच्या आगमनाप्रसंगी निसर्गाने अधिकच साजशृंगार केलेला असतो. फुललेल्या फुलाला कोमलतेचा बहार आलेला असतो. झाडं पाना-फुलांनी नववधुगत बावरुन गेलेली असतात आणि पक्षाचं आकाशात झुलायचं स्वप्नही साकार झालेलं असतं. निसर्गाच्या तारुण्याचे हिरवेपण पाहून माणसाचं मन बहरुन आनंदून आलेलं असतं. वसंतोत्सव हा कालांतराने होळी दहनाच्या रुपाने साजरा होऊ लागला. उत्सवाचं स्वरुप जरी बदललं तरी उद्देश धोरण तोच आहे. प्रसन्नता, आनंद, मस्ती या दिवसात मन उचंबळून आलेलं असतं. लहान मुलांना पीडा देणाऱ्या 'होलिका', 'ढुंढा', 'पुतना' ह्यांसारख्या राक्षसींच्या दहनांच्या कथांमधे ह्या उत्सवाच्या परंपरेचा शोध काही लोक घेतात. एका पौराणिक कथेनुसार भगवान विष्णूचा भक्त असलेल्या प्रल्हादाला मारण्यासाठी हिरण्यकश्यपूने धाडलेल्या होलिकादेवतेचा श्रीविष्णू देवाने वध केला होता. होलिकेला वर होता की तिला अग्नी जाळू शकणार नाही, परंतु प्रल्हादाला जाळण्यासाठी तिने त्याला मांडीवर घेऊन अग्निकुंडात प्रवेश केला. प्रल्हाद बचावला व होलिकेचे दहन झाले अशी आख्यायिका प्रचलित आहे. अशाप्रकारे हिंदूंच्या इतर सणाप्रमाणे होलिका दहन देखील वाईटावर चांगल्याचा विजयाचे चांगले प्रतीक आहे. कारण तो हिरण्यकश्यपूवर नरसिंहाच्या रूपात विष्णूच्या विजयाचे स्मरण करतो. वाईट गोष्टींवर विजय मिळवणे ही या सणाची व्याख्या आहे. या प्रकारे होळीची उत्पत्ती झाली आणि ती प्रामुख्याने भारतीय उपखंडात साजरी केली जाते.

होळी भारतात वसंत ऋतूचे आगमन, हिवाळ्याचा शेवट आणि प्रेमाचा बहर साजरी करते. हे वसंत ऋतु कापणीच्या चांगल्या हंगामासाठी देखील एक आवाहन आहे. हे एक रात्र आणि एक दिवस चालते, हिंदू पंचांग फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेच्या संध्याकाळी (पौर्णिमेचा दिवस) चालू होतो, जो इंग्रजीब ग्रेगोरियन कॅलेंडरमध्ये मार्चच्या मध्यभागी येतो. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण लोक आनंदाने साजरा करतात. या उत्सवाला 'होलिकादहन' किंवा 'होळी पौर्णिमा', 'शिमगा', 'हुताशनी महोत्सव', फाग, फागुन 'दोलायात्रा', 'कामदहन' अशा वेगवेगळ्या संज्ञा आहेत, ज्याला कोकणात शिमगो म्हणतात. फाल्गुन महिन्याच्या शेवटच्या दिवशी साजरा होणाऱ्या ह्या लोकोत्सवाला 'फाल्गुनोत्सव' आणि दुसऱ्या दिवशी सुरू होणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनानिमित्त 'वसंतागमनोत्सव' किंवा 'वसंतोत्सव' असेही म्हणण्यात येते. देशीनाममाला या ग्रंथात हेमचंद्र याने या सणालाला सुग्रीष्मक असे नाव दिले आहे. यातूनच 'शिमगा' असा अपभ्रंश तयार झाला असावा असे मानले जाते.



भारताचा सांस्कृतिक सण म्हणजे होळी ! अंतःकरणातील अपार प्रेमाने रंग गुलालाची उधळण करणारा. रंगोन्मादानं भारतीय मातीत अंर्तबाहय मस्ती भरणारा. प्रांत, भाषा व धर्माच्या विभिन्न रंगांच्या सरितांना राष्ट्रीय रंगस्थळीच्या त्रिवेणीत एकात्मतेच्या रंगानं प्रवाहित करणारा हा राष्ट्रीय सण. होळी-धुळीवंदन सणाला महाराष्ट्रात धामधुम, युवकांचा जल्लोष, मादक द्रव्यांचा सर्रास वापर व आहारी जात या सणाची सणसण समाजात पसरवितांना दिसतात. होळीच्या दिवशी राजा आणि प्रजा एक होऊन एकमेकांवर रंग उडवितात ते काय निदान वर्षाचे चार-पाच दिवस तरी समानतेचे तत्व अनुभवण्यासाठी? मानवी आरोग्यावर होणारे ऋतुचे परिणाम याचा संकेत देणारा सण आहे, निसर्ग आनंदाचा सण आहे. होळीमध्ये एकमेकांना विविध रंग लावून हा सण साजरा करतात. तसेच विविध पारंपरिक गाणी, पारंपरिक नृत्ये यामध्ये समाविष्ट असतात. बंजारा समाजामध्ये होळीला फार महत्त्व आहे. बंजारा समाजामध्ये, बंजारा भगिनी पारंपरिक पोशाखात नृत्य करतात. विशेषतः उत्तर भारतामध्ये उत्साहाने साजरा होणारा एक सण आहे. याला वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. भारताच्या निरनिराळया राज्यात निरनिराळया प्रकारे होळी करतांना दिसतात. परंतू होळी पेटविण्याचा प्रकार सर्वच ठिकाणी सारखाच होत असतो. महाराष्ट्रात शेणाच्या गोवऱ्यांची किंवा लाकडांची होळी करण्याची प्रथा आहे. कोकणपट्टीत सुपारीचे झाड, आंब्याचे किंवा इतर कुठल्याही झाडांचा सोट देवळापूढे रोवून त्यांच्या तळाशी लहान-लहान लाकडे व गवत जाळतात. इतर प्रदेशाच्या मानाने महाराष्ट्रातील कोकणपट्टीत या सणाला बरेच महत्व आहे. गोव्यात काही ठिकाणी वायंगणी शिमगा म्हणजे चैत्र शुक्ल पक्षात देखील घुमट (मडक्याचे वाद्य) वाजविले जावून जल्लोशात होळी सण साजरा करतांना आढळतात. होळी हा रंगाचा आणि कृषी संस्कृतीचे जतन करणारा सण आहे. शेतकरी वर्गात होळी या सणाचे खास महत्त्व आहे. पौराणिक इतिहास पाहता या सणाचे आणि कृष्ण-बलराम यांचे नाते दिसून येते. होळीच्या निमित्ताने या दोन्ही देवतांचे स्मरण आणि पूजा करतात. यादिवशी हाती आलेल्या पिकाबद्दल देवाला धन्यवाद देण्यासाठी प्रार्थना करतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी गव्हांच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याचीही प्रथा आहे. आदिवासी जमातीतील स्त्री-पुरुष हा दिवस गुलाल उधळून, टिमक्या-ढोल वाजवून, नृत्य करून उत्साहाने साजरा करतात. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील लोकांत होळी हा सण उत्साहाने साजरा केला जातो. होळी साजरा करत असतांना आदिवासी लोकांच्या भोजनामध्ये गोड पुरी, मासळी व गोड भात या पदार्थांचा समावेश असतो. सातपुडा पर्वत प्रदेशातील आदिवासी होळीच्या दरम्यान काठी उत्सव साजरा करतात. बाराव्या शतकापासून ही परंपरा सुरू असल्याचे दिसते. दागदागिने घालून, नक्षीकाम करून स्त्री-पुरुष यात सहभागी होऊन विविध वाद्यांच्या तालावर नृत्य करतात.

महाराष्ट्रात होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळतात येतात आणि पेटलेल्या होळीभोवती 'बोंबा' मारत लोक प्रदक्षिणा घालतात. होळीला नारळ अर्पण करून नैवेद्य दाखवतात. महाराष्ट्रात पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्याची रीत आहे. होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदनाचा सण साजरा केला जातो. याला 'धुळवड' असेही म्हणतात. या दिवशी होळीची रक्षा अंगाला फासली जाते किंवा ओल्या मातीत लोळण घेतली जाते. होळीनंतर ५ दिवसांनी रंगपंचमी हा सण साजरा केला जातो. एकमेकांना गुलाल लावून रंगांची उधळण करणे, सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून याकडे पहिले जाते. होळी हा रंगाचा सण आहे, समस्त समुदाय होळीची विधियुक्त पूजा करतो. होळी समोर गाऱ्हाणे, नवस बोलण्याची परंपरा आहे. नागपूरकर भोसल्यांच्या वाड्यात व तसेच पेशवाईत खेळली जाणारी होळी आणि रंगपंचमी तर महाराष्ट्राच्या इतिहासात सुप्रसिध्दच आहे. स्वतंत्र भारतात होळीची प्रथा पंडित जवाहरलाल नेहरुंजी पण जोपासली, जपली ! प्रेम आणि आनंद पसरवणे आपण या सणाचा स्वीकार करत असताना, या मनःपूर्वक शुभेच्छांसह प्रेम आणि आनंद पसरवू या.

**या प्रसंगी सर्वांना सुरक्षित होळी आणि धुलीवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा !**

**- प्रविण बागडे**
**नागपूर ९९२३६२०९१९**

## सांकेतिक होळी..

होलिकोत्सव साजरे
उत्सव हो सांकेतिक
शुभेच्छा मनमुराद दे
प्रदानविचारमौक्तिक

जंगलेजाळून टाकतो
सुख भोगाय भौतिक
उलट विचार चालला
न कळे सण कौतिक

हिंदूचासण ना केवळ
बनो उत्सव जागतिक
प्रल्हादाचे जाण सत्व
होली कथा दृष्टांतिक

विसरावा भेद वैरभाव
सण उत्सव नैमित्तिक
अंधश्रध्दा निर्मूलन हो
सुविचारहवे सयुक्तिक

सर्व धर्मियी खेळ बनो
रंग ना द्यायचाधार्मिक
नशा पाणी भांग शांग
गालबोट नको भौगिक

भंग रंग जमे चकाचक
म्हणतात कुणीधौर्तिक
शिवराळ बोंबाट करी
घालवती सण लौकिक

हास्यकविसंमेलन भरे
व्यंग हसवावे शाब्दिक
वेदना ना अंतर्मनामात्र
पुरवा विचार बौध्दिक

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## लागता चाहूल वसंतची..!

लागता चाहूल वसंतची
हिरव्याची होऊन पिवळे.
संग वारा घेऊन गेला
सोडूनी साथ माझी झाले मोकळे.
नाही सोसली झळ उन्हाची
पर्णहीन करुनी मज गेलात सगळे.
दशकानु दशके उभा एकटा मी
खोलवर रुजवूनी खंबीर मुळे.
मोहात गुंतवी हा मंद वारा
तुम्हा सोबती घेऊनी करी प्रेमचाळे..
चाले मनमोहिनी तुम्हावरी
कपट प्रेमजाल तुम्हां ना कळे.
धुळ मातीनं मलीन करुनी
कधी घडवी वादळ कधी वावटळे..
पानांनो...
या परत ! माझ्या या पर्णहीन फांदीवर
नेसवा हिरवा शालू फुलवा अंकुर कोवळे..

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि. बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

# अपप्रवृत्तीमुळे पवित्र सणाला गालबोट लागते!



होळी हा आपल्या संस्कृतीतील एक मोठा आणि महत्वाचा सण आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण विविध नावांनी साजरा केला जातो. हा सण होळी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोलायात्रा, कामदहन अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळीच्या दिवशी आपण आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून राख करावे अशी कल्पना आहे. त्यामुळे आपले मन निर्मळ व्हावे अशी अपेक्षा असते. आपल्या मनातील वाईट विचारांना होळी प्रमाणे आगीत जाळून सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करण्याचा हा दिवस. महाराष्ट्रात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कोकणात तर हा सण अधिक मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात.

होळीच्या दुसऱ्या दिवशी अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात मात्र गेल्या काही वर्षात या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे या सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. होळीचा सण साजरा करताना धांगडधिंगा घातला जातो. धुलीवंदनाच्या दिवशी तर एकमेकांना गुलाल लावण्याऐवजी रसायन मिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. काही समाज कंटक पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मरतात.

त्यात अनेकजण जखमी होतात. अशा घटनांत यापूर्वी काहींना आपले डोळे गमवावे लागले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. काही महाभाग तर जाणीवपूर्वक महिलांना टार्गेट करतात. काहीजण रंगाऐवजी नासकी अंडी फेकून मारतात. काहीजण तर या दिवशी लाऊस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात. धुलीवंदनच्या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. मद्यपान करून नृत्य करताना बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धुलीवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. मात्र या अपप्रवृत्तीमुळे या सणाला गालबोट लागत आहे. ही अपप्रवृत्ती दूर करून सर्वांनी होळीचा सण साजरा करावा. जे समाज कंटक या पवित्र सणाला गालबोट लावतील त्यांना पोलिसांनी कडक शासन करावे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# खा.लंके यांचे विखे पिता-पुत्रांना खुले आव्हान; तर तुमच्याशी गुंडगिरी करण्याची तयारी



**औरंगजेब समाजसुधारक नव्हता. छत्रपती उदयनराजे भोसले यांनी औरंगजेबाची कबर काढून टाकण्याची मागणी केली आहे. त्यासंदर्भात पत्रकारांनी छेडले असता खा.लंके म्हणाले, औरंगजेब समाजसुधारक किंवा राष्ट्रपुरुष नव्हता. त्याची कबर ठेवण्याचे काहीच कारण नाही ती कबर काढून टाकण्यात यावी. अशी भूमिका खा.लंके यांनी मांडली.**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** आम्ही गुंडगिरी करत नाही, परंतू तुमचे तसे म्हणणे असेल तर तुमच्याशी गुंडगिरी करण्याची आमची तयारी आहे. तुम्ही सांगा आम्ही दोन हात करू, तुम्ही वेळ सांगा असे आव्हान देत सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीमधील वातावरण आपण असुरक्षित होऊ देणार नाही. असा ठाम विश्वास खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला.

खासदार नीलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येक महिन्यातील एका रविवार गड किल्ले संवर्धन करण्याचा संकल्प त्यांनी केला. त्यानिमित्त घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत खा.नीलेश लंके हे बोलत होते. पत्रकारांनी सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीसंदर्भात होणाऱ्या आरोप प्रत्यारोपासंदर्भात पत्रकारांनी छेडले असता खा. लंके यांनी आक्रमकपणे आपली भूमिका मांडली.

खा.लंके म्हणाले, विखेंच्या परिसरातील नगर एमआयडीसीची काय अवस्था झाली ? ही वसाहत बंद पडली आहे. आरोप करणारांनी त्यांच्या भागात एखादा उद्योग आणावा. सुपा एमआयडीसीमध्ये कोणाचीही तक्रार नाही. तरीही उठ सुट सांगायचे की गुंडगिरी थांबवा.

गुंडगिरी कोणाची आहे ? ते त्यांनी नाव घेऊन सांगावे. जर तुम्हाला वाटत असेल की आम्ही गुंडगिरी करतो, त्यावर आमचे म्हणणे आहे की आम्ही गुंडगिरी करत नाही. परंतू तुमचे म्हणणे असेल तर तुमच्याशी गुंडगिरी करण्याची आमची तयारी आहे. आमच्याकडे ताकद आहे, तुम्ही सांगा आम्ही दोन हात करू, तुम्ही वेळ काळ सांगा. पाठीमागून याला त्याला त्रास देण्याचे काम करू नका. मी एमआयडीसीचे वातावरण असुरक्षित होऊ देणार नाही असा ठाम विश्वास खा.लंके यांनी व्यक्त केला.

# थोडक्यात

## शहरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे अपराधाला बसणार आळा - सपो.नि.तिडके

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.१२, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद शहरावर आता सीसीटीव्हीची करडी नजर असणार असल्याने यापुढे गुन्हेगारीवर मोठा आळा बसणार असल्याचे मुक्रमाबाद पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भालचंद्र तिडके यांनी सांगितले. मुक्रमाबाद शहरासह पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या गाव, वाडी, तांडे यांच्या सुरक्षेची जबाबदारी व अपुऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या पाहता पोलिस प्रशासना समोर अनेक प्रश्न निर्माण होत होते. पण स.पो.नि.पोलीस भालचंद्र तिडके यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत लोकवर्गणीतून शहरात ठिकठिकाणी सीसीटीव्ही बसविण्याचा निर्णय घेतल्यामुळे सुरक्षेचा मोठा प्रश्न मिटला आहे.मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद हे शहर निजामकालीन तालुका असून येथे मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे या शहराशी नागरिकांचे सतत येणे जाणे सुरूच असते वर्दळीच्या असलेल्या या शहराशी परिसरातील ४० ते ५० गाव वाडी तांड्यातील लोकांचा सतत संपर्क असतो. शहराचा वाढता विस्तार, लोकसंख्या, शाळा, महाविद्यालये विद्यार्थी संख्या व्यापार यांच्या सुरक्षेची जबाबदारी ही येथील पोलिस कर्मचाऱ्यांवर येऊन ठेपली होती. याचाच फायदा घेत शहरात छोट्या मोठ्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले होते. तर शाळा व महाविद्यालये परिसरात रोडरोमिओंचा त्रास होत होता. स.पो.नी. भालचंद्र तिडके यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत शहरातील नवतरुणांना एकत्र केले. शहरात सीसीटिव्ही बसविण्यासाठी व्यापारी, राजकीय पुढारी व इतर दानशूर व्यक्तींकडून लोकवर्गणी जमा केली. कमी पडलेले पैसे स्वतः देऊन शहरातील देगलूर - रेणापूर या मुख्य राष्ट्रीय मार्गावर व मुख्य बाजार पेठ, शाळा, महाविद्यालये परिसर, भवानी चौक अशा १३ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले. त्यामुळे शहरातील गुन्हेगारीवर यामुळे आळा घालण्यास मदत होणार आहे. सीसीटीव्हीकमेरे बसविल्याने सीमावर्ती भागातून येणाऱ्या व्यक्तींवर व त्यांच्या हालचालीवर करडी नजर असणार आहे. शाळा व महाविद्यालय परिसरात टवाळखोरांवर करडी नजर राहणार आहे. येत्या काही दिवसात शहरातील सर्वच मंदिरे, देवस्थान या ठिकाणीही सीसीटिव्ही बसविण्यात येणार आहेत. अशी माहिती मुक्रमाबाद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भालचंद्र तिडके यांनी दिली.

## आ.खरे यांचे प्रयत्नातून अनेक वर्षापासून रखडलेला प्रश्न लागला मार्गी

### आष्टी उपसा सिंचन योजनेसाठी ४० कोटीची तरतूद



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१२, पंढरपूर :** मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे धाडसी आणि कर्तव्यतत्त्व आमदार राजू खरे यांनी आपल्या मतदारसंघात विकास कामाचा झपाटा सुरू केला आहे. अशातच आष्टी उपसा सिंचन योजनेकरीता या झालेला २०२५ -२६ च्या अर्थसंकल्पात तब्बल ४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे मागील अनेक वर्ष प्रयत्न करून ही न सुटलेल्या प्रश्नांना आ.खरे यांच्या अगदी पहिल्याच प्रयत्नात भरघोस यश मिळाले आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे मागणी केली होती. त्याप्रमाणे निधीची तरतूद केली आहे. मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्याच्या भूसंपादनासाठी कित्येक वर्ष या भूसंपादनाच्या मागणीसाठी शेतकरी झगडत होते. परंतु त्याला अद्याप त्याला यश मिळाले नव्हते. तत्कालीन लोकप्रतिनिधीची उदासीनता यास कारणीभूत होती. सदरची बाब आ.राजू खरे यांच्या लक्षात येताच, यासंबंधी शेतकरी व पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांची दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी शेटफळ ग्राम पंचायत कार्यालय याठिकाणी संयुक्त बैठक घेण्यात आली होती. लगेचच २२ फेब्रुवारीला याबाबतची मागणी करणारे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि राज्याचे अर्थमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना देण्यात आले. त्यामुळे आ.खरे यांच्या मागणीची दखल घेवून निधीची तरतूद करण्यात आल्याने या भागातील मोठा प्रश्न सोडविण्यात अगदी काहीं दिवसातच यश मिळाले आहे.

मोहोळ मतदार संघाचे नवनिर्वाचित कर्तव्यदक्ष आमदार राजू खरे यांनी या कित्येक वर्षाच्या रेंगाळत पडलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा पाठपुरावा करून शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सरकार दरबारी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवून, या योजनेला यश मिळविले. आष्टी उपसा सिंचन योजनेसाठी ४० कोटीचा भरीव निधी दिल्याबद्दल करून राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांचे मतदार संघातील जनतेच्या वतीने आ.खरे यांनी मनःपूर्वक आभार मानले.

## छत्रपती युवा सेना संघटनेची मागणी जिल्हाधिकारी निवेदन सादर



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१२, विंचूर (नाशिक) :** निफाड भूमिअभिलेख कार्यालयात शिपाई मार्फत लाच

मागणाऱ्या मुख्यसूत्रधार उपधिक्षक भाबड यांना त्वरित निलंबित करण्याची कार्यवाही करावी तसेच शिपाई नितेंद्र गाडे व उपधिक्षक भाबड यांची उच्चस्तरीय चौकशी करावी. तसेच त्यांची संपत्ती जप्त करण्यात यावी.

अशी मागणी बुधवार, दिनांक १२ मार्च २०२५ रोजी छत्रपती युवा सेनेच्या वतीने निवासी जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे. भुमी अभिलेख अधिकारी भाबड यांच्यावर कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले जाईल, असा इशारा ही छत्रपती युवा सेनेच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी छत्रपती युवा सेनेचे प्रदेश प्रवक्ते तथा संपर्क प्रमुख यशभाऊ बच्छाव, प्रदेश सरचिटणीस निकेश पाटील, नाशिक जिल्हाध्यक्ष किशोर वडजे, महानगरप्रमुख मंगेश कापसे, शिक्षक आघाडी प्रमुख राहुल पगारे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# लग्नात करवली म्हणून आली, ६४ तोळ्यांचे दागिने घेऊन गेली

## युवतीसह सोनार गजाआड



**खड्डा करून दागिने पुरले**

**प्रशंसा काळोखे हिच्यावर संशय असल्याने तोफखाना पोलीसांनी तिला ताब्यात घेत विश्वासात घेऊन चौकशी केली असता, तिने दागिने चोरी केल्याची कबुली दिली. त्यातील १० तोळ्याचे दागिने सोनार किशोर लोळगे याला विक्री केले असून बाकीचे दागिने घराच्या बाजूला पडलेल्या मोकळ्या जागेत खड्डा करून लपवले असल्याची कबुली दिली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन ५७ तोळे ९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे व चांदिचे दागिने हस्तगत केले.**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** नवरीसोबत करवली म्हणून आलेल्या युवतीने लग्न घरातून तब्बल ६४ तोळे ७ ग्रॅम सोन्याचे दागिने व २७ ग्रॅम चांदीचे दागिने असा एकूण ५१ लाख ८६ हजारांचा ऐवज चोरून नेला होता. दरम्यान, तोफखाना पोलिसांनी केवळ २४ तासांत चोरीप्रकरणाचा छडा लावत ५७ तोळे ९ ग्रॅम सोन्याचे दागिने व चांदीचे दागिने असा ४४ लाख २ हजाराचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

दागिने चोरणार्या युवतीसह दागिने विकत घेणार्या सोनारालाही गजाआड केले आहे. दरम्यान, याप्रकरणी अॅड. निखील बबन वाकळे (वय ३४ रा. उदय हाउसिंग सोसायटी, रेणावीकर शाळेच्या मागे, अहिल्यानगर) यांनी (दिनांक १० मार्च) रात्री उशिरा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. प्रशंसा प्रशांत काळोखे (वय १९ रा. न्यू ख्रिश्चन कॉलनी, स्टेशन रस्ता, कोठी, अहिल्यानगर), किशोर सुधाकर लोळगे (वय ३४ रा. इंद्रप्रस्थ कॉलनी, हरिमळा, सोलापूर रस्ता, अहिल्यानगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. ऍड. वाकळे यांनी तब्बल ६४ तोळे ७ ग्रॅम सोन्याचे दागिने व २७ ग्रॅम चांदीचे दागिने चोरीला गेल्याचे तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांना सांगितले. त्यांनी ऍड. वाळके यांची फिर्याद तात्काळ नोंदवून घेत गुन्हे शोध पथकाने तपासाच्या सूचना केल्या. गुन्हे शेध पथकाने केवळ २४ तासांतच चोरीचा पर्दाफाश करून दागिने हस्तगत केले. या कामगिरीबद्दल तोफखाना पोलीसांचे विशेष कौतुक केले जात आहे.

# उपसा सिंचन योजनेचा सर्वे करण्यास तातडीने निधी द्या

## भूमिपुत्रांची जलसंपदा मंत्र्यांकडे मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील दुष्काळी गावांना शेतीसाठी कुकडी प्रकल्पातून हक्काचे पाणी मिळावे. ही गेली ४० वर्षापासून ची मागणी आहे. या प्रलंबित प्रश्नावर १३ जानेवारी २०२५ रोजी कान्हूर पठार या ठिकाणी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थित पाणी परिषद झाली होती. त्या परिषदेत नाम दार विखे पाटील यांनी दोन महिन्यांत सर्वेसाठी निधी उपलब्ध करून सर्वे करू अशी घोषणा केली होती.

मात्र दोन महिने उलटून गेले तरी कोणत्याही प्रकारे हालचाल झालेली दिसत नसल्याने तसेच पिंपळगाव खांड धरणाचे पाणी शिंदोडीपर्यंत मिळावे यासाठी आवर्तन सुरू असताना मुळा नदीकाठच्या जवळपास २०० शेतकऱ्यांनी पारनेरचे आमदार काशिनाथ दाते व संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांच्या उपस्थित जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली होती. शिंदोडीपर्यंत पाणी देऊ असे आश्वासन त्या वेळी देण्यात आले होते. पण शिंदोडीपर्यंत पाणी मिळाले नाही. अशा या प्रमुख दोन प्रश्नांवर भूमि पुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या शिष्टमंडळाने मुंबई येथे जाऊन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मंत्रालयात जाऊन भेट घेतली.

यावेळी ना.विखे पाटील यांच्याशी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा केली. या चर्चेत पारनेर तालुक्यातील उपसा सिंचन योजनांचा सर्वे करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यात यावा. पिंपळगाव खांड धरणाच्या लाभक्षेत्रात जांबुत, टेकडवाडी, साकुर, मांडवे या बंधाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

या मागण्या प्रामुख्याने बैठकीत लावून धरण्यात आल्या. मात्र या बैठकीत कुठल्याही प्रकारे ठोस निर्णय झाला नाही. फक्त हे प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन जलसंपदा मंत्री ना.विखे यांनी दिले. यावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर, अशोक आंधळे, बाळशिराम पायमोडे, संतोष वाबळे, मनोज तामखडे, अन्सार पटेल, बाळासाहेब वाळुंज, सुभाष डोंगरे, अनिल सोबले, शरद बालवे, वसंत साठे, बापू (गट मेजर), शंकर पठारे, यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा उपक्रम

## प्रवाश्यांच्या समस्या व निराकरणासाठी 'प्रवासी राजा दिन' व 'कामगार पालक दिन'




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, बुलडाणा :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलडाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिण्याच्या सोमवार व शुक्रवार ला सकाळी १० ते २ या वेळेत प्रवासी राजा दिन व दुपारी ३ ते ५ या वेळेत कामगार पालक दिन आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने मार्च महिण्यासाठी वेळापत्रक जाहिर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाचे कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सांयकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यारी वैयक्तिक प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तात्काळ निराकरण करतील.

बुलडाणा विभागातील चिखली आगार येथे सोमवार दि. १७ मार्च २०२५ रोजी, खामगांव आगार येथे शुक्रवार दि. २१ मार्च, मेहकर आगार येथे सोमवार दि. २४ मार्च, मलकापूर आगार येथे शुक्रवार दि. २८ मार्च, जळगांव जामोद येथे शुक्रवार दि. ४ एप्रिल व शेगांव आगार येथे सोमवार दि. ७ एप्रिल रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

# ठाण्याच्या आनंद आश्रमात शिवसेना शिलेदारांचा ‘जनसंवाद’



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१२, ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेण्यासाठी व जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी शिवसेनेच्या शिलेदारांनी समस्या, सेवा आणि समाधान या त्रिसुत्रीवर आधारीत आनंद आश्रमात मंगळवार दि.११ रोजी ‘जन संवाद’ उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कल्याणचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे माजी महापौर अशोक वैती व माजी विरोधी पक्षनेता मनोज शिंदे यांनी नागरिकांच्या शेकडो तक्रारींचे निवारण यावेळी केले.

तसेच दर मंगळवारी आनंद आश्रमात जन संवाद उपक्रम नियमित सुरू राहणार असून दर गुरुवारी ठाणे महापालिका कर्मचाऱ्यांच्या तसेच ठामपा संबधित नागरीकांच्या तक्रारी व समस्या सोडविल्या जाणार असल्याचे अशोक वैती आणि मनोज शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. शिवसेनेचे ‘ठाणे’ ठाण्याची ‘शिवसेना’ हे ब्रीद जपत आजवर ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हा हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांचा शिरस्ता माजी मुख्यमंत्री तथा राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कायम राखला आहे.

या पार्श्वभूमीवर ठाण्यातील शिवसेनेच्या शाखा शाखांमध्ये प्रभागातील समस्यांची तड लावली जात आहेच. तर, आता शिवसेनेच्या वरिष्ठ नेते मंडळीनीही लोकांच्या समस्या ऐकून त्या संबंधित प्रशासनाकडून सोडवून घेत नागरिकांना दिलासा देण्यासाठी जन संवाद उपक्रमाचे महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. त्या अनुषंगाने समस्या, सेवा आणि समाधान या त्रिसुत्रीवर आधारीत शिवसेनेचे माजी महापौर अशोक वैती आणि माजी विरोधी पक्षनेता मनोज शिंदे यांनी मंगळवारी ठाण्यातील टेंभी नाक्यावरील आनंद आश्रमात जन संवाद उपक्रम आयोजित केला होता.

- ✻ अतिक्रमण विषय
- ✻ कर आकारणी नव्याने करा करणे
- ✻ इमारतीमधील समस्यांचे विषय
- ✻ झाडे तोडणे नालेसफाई
- ✻ स्थानिक महिला खेळाडूंना परदेशी जाण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधी मधून आर्थिक मदत करण्याबाबत विषय
- ✻ पाण्याच्या बिलाबाबतचे विषय / नवीन जोडणी करणे
- ✻ विभागामध्ये विद्युत लाईट नसणे
- ✻ आर्थिक फसवणूक व मदत मिळण्याबाबत इमारत विकासकांच्या विषयी तक्रारी
- ✻ दिव्यांग नवीन दुकाने मिळण्याबाबत प्रलंबित प्रश्न दुकानांचे
- ✻ वाहतूक विभागातील समस्या रोड लगतच्या पार्किंगमुळे होणाऱ्या त्रास अनधिकृत पार्किंग यासारखे विषय आनंद आश्रमात आयोजित जन संवाद उपक्रमात उपस्थित शेकडो नागरिकांनी आपल्या तक्रारी व समस्यांचे निवेदन यावेळी सादर केले.

# थोडक्यात

## परिक्रमाच्या सिद्धी शिर्के ला अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत कांस्यपदक



**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.१२, श्रीगोंदा (अहिल्यानगर) :** परिक्रमा शैक्षणिक संकुलनाची महिला खेळाडू कु.सिद्धी शिर्के हिने भुवनेश्वर येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ सायकलिंग ट्रॅक इव्हेंट या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत कास्यपदक मिळवले. सिद्धी ही परिक्रमा शैक्षणिक संकुलनातील अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत पदक मिळवणारी पहिली महिला खेळाडू आहे. तिच्या या यशाबद्दल परिक्रमा शैक्षणिक संकुलनाचे संस्थापक, माजी मंत्री बबनराव (दादा) पाचपुते, अध्यक्षा डॉ.प्रतिभा पाचपुते, सचिव आमदार विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड.प्रतापसिंह पाचपुते, अकॅडमीक डायरेक्टर प्रा.इंद्रायणी पाचपुते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.अनिल पुंड, डेप्युटी डायरेक्टर डॉ.प्रा.संजीव कदम पाटील, प्राचार्य मोहन धगाटे, प्राचार्य डॉ. सुनील निर्मळ, प्राचार्य डॉ.सुदर्शन गिरमकर, प्राचार्य डॉ.रमेश शिंदे, प्राचार्य डॉ.प्रशांत सूर्यवंशी, प्राचार्य डॉ.पांडुरंग इथापे यांनी सिद्धीचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सिद्धीला परिक्रमा क्रीडा विभागाचे मार्गदर्शन लाभले.

## ६ गावठी दारू अड्ड्यांवर छापे सव्वा लाखाचा मुद्देमाल नष्ट; नगर तालुका पोलिसांची कारवाई

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** नगर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत ६ अवैध गावठी हातभट्टीच्या अड्ड्यांवर पोलिसांनी छापा टाकला आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल १ लाख २५ हजार रुपये किंमतीचा मुदेमाल नष्ट केला असून दोन महिलांसह चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवार, दिनांक १२ मार्च २०२५ रोजी ही कारवाई करण्यात आली आहे. सोमनाथ नारायण पवार (रा.साकत), श्रीरंग पांडुरंग गव्हाणे (रा.वाळुंज), गणेश टिल्लू पवार (रा.नेप्ती), कानिफनाथ भिमाजी कळम कर (रा.नेप्ती) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्याची नावे आहेत. अवैध धंद्यांवर कारवाई दरम्यान, नगर तालुका परिसरात अवैध गावठी हातभट्टी तयार करण्याचे काम सुरु असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार अवैध गावठी अड्ड्यांवर कारवाई करत १ लाख २५ हजार रुपये किंमतीचे २५०० लिटर गावठी कच्चे रसायन, १४०० हजार रुपये किंमतीची १४० लीटर गावठी हातभट्टी दारू नष्ट करण्यात आली आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी संपतराव भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली नगर तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते सो, पोसई धुमाळ सो, सहायक फौजदार गांगर्डे, पोलीस हेड कॉन्स्टेबल रविकिरण सोनटक्के, दाते, मंगेश खरमाळे, पोलीस कॉन्स्टेबल विक्रांत भालसिंग, संभाजी बोराडे यांच्या पथकाने बजावली आहे.

# राजधानीत यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नवी दिल्ली :** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती आज दोन्ही महाराष्ट्र सदनात साजरी करण्यात आली.

कस्तुरबा गांधी मार्ग स्थित महाराष्ट्र सदनातील यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळयास करून अभिवादन केले, यामध्ये केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले, सर्वश्री खासदार सुप्रिया सुळे, सुनिल तटकरे, शोभा बच्छाव, नरेश मस्के, बाळुमामा म्हात्रे, निलेश लंके, भाऊसाहेब वाकचौरे, श्यामकुमार बर्वे यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यासह अतिरिक्त निवासी आयुक्त निवा जैन, सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार, पत्रकार, सदनातील अतिथी मान्यवरांनी आणि महाराष्ट्र सदनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

कोपर्निकसमार्ग स्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

**महाराष्ट्र परिचय केंद्रात यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी**

महाराष्ट्र परिचय केंद्रात उपसचांलक अमरज्योत कौर अरोरा यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माहिती अधिकारी अंजु निमसरकर यांच्यासह कार्यालयातील उपस्थित कर्मचाऱ्यांनेही प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## यशवंतराव चव्हाण यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, बुलडाणा :** देशाचे माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती बुधवार, दिनांक १२ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, अजिक्य गोडगे यांच्यासह उपस्थित अधिकारी - कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# जिल्हाधिकारी साहेब जरा इकडे पण लक्ष द्या..!




**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१२, कुंडलवाडी :** कुंडलवाडी येथील पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या हुनगुंदा,नागणी येथील मांजरा नदी पात्रातून अवैद्यरित्या रेती वाहतूक करणाऱ्या हायवावर पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या पथकाने दि.११रोजी कारवाई केली आहे.या कारवाईत१८लाख २५हजाराचा मुद्देमाल जप्त करून दोन आरोपीवर गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

जिल्ह्यातील मांजरा वाळू पट्ट्यात धाड घालून करण्यात येत असलेल्या कारवाईत मोठे मोठे घबाड हाती लागत आहेत.अचानक होत असलेल्या कारवाईमुळे अनधिकृत वाळू उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्या व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहेत. मात्र गेले कित्येक दिवस राजरोसपणे वाळूंची बेसुमार लूटमार होत असताना स्थानिक पोलीस प्रशासन व महसूल विभाग आहे तरी कुठे?असा प्रश्न पडतो आहे. येथील वाळूला जिल्ह्यासह तेलंगणा कर्नाटक या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मागणी असून दररोज कित्येक हायवा ट्रॅक्टर सुसाट वेगाने वाळूची वाहतूक करत आहेत. पण प्रशासनाला तावडीला बांधल्यासारखे वाळू व्यवसायिक वावरत आहेत.येथील प्रशासनाची कुणालाही भीती राहिली नाही त्यामुळे वाळू तस्करांची दादागिरी वाढत आहे. मांजरा पट्ट्यात दररोज राजरोसपणे कोट्यावधींची वाळू चोरी होत असून स्थानिक पोलीस प्रशासन, तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपजिल्हाधिकारी असताना या भागात वाळू चोरी जाते व मोठ्या प्रमाणात हायवांची वाहतूक होते. याची स्थानिक पोलीस व महसूल कर्मचाऱ्यांना माहिती नाही की, त्यांच्याच आशीर्वादाने हे सर्व सुरू आहे याची चर्चा मात्र कुंडलवाडी परिसरातील नागरिकांत सुरू आहे.

आज पर्यंत पकडण्यात आलेले हायवा ट्रॅक्टर यावरून शासनाचा कोठ्यावधींचा महसूल बुडतो आहे असं एक-दोन पट्ट्यात टाकण्यात आलेल्या धाडीतून दिसत आहे असे अजून धाडी टाकल्यास मोठे घबाड हाती लागू शकतं. एवढ्या मोठ्या प्रमाणात वाळू तस्करी होत असल्याचे माहिती होऊन सुद्धा अशा वाळू तस्करांवर वेळीच कारवाई होत नसेल तर, स्थानिक पोलीस प्रशासन, महसूल अधिकारी, कर्मचारीही महसूल बुडवण्यास तेवढेच जबाबदार असल्याचे सूर आता उमटू लागलं आहे. स्थानिक पोलीस व महसूल प्रशासनाच्या समोर वाळू चोरी होत असताना स्थानिक पोलीस व महसूल प्रशासन मात्र मूग गिळून बसल्याची भूमिका दिसत आहे. वाळू चोर या प्रशासनास किती मलिदा पुरत आहेत असे लोकांमध्ये चर्चा आहे. उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यावर देखील शंका व प्रश्नचिन्ह? निर्माण होत आहेत. याबाबत जिल्हाधिकारी साहेब याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र देशमुख यांच्या दिलेल्या फिर्यादी वरून हायवा क्रमांक(जी जे ३६टी५२११)आरोपी चालक धम्मानंद शंकर सोनकांबळे(वय३९)व्यवसाय चालक रा.अर्जापूर दत्ता संग्राम शिंदे व्यवसाय शेती रा.नागणी यांच्याविरुद्ध गुन्हा घडला दि.११/०३/२०२५रोजी १०:४५वाजता कुंडलवाडी ते पिंपळगाव रोडवर संत कबीर विद्यालय पिंपळगाव येथे रजिस्टर नंबर ४७/२०२५कलम ३०३(२),३(५)BNS दाखल आला आहे. सदरील ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक विशेष पथक व्ही एस आरसेवार,पो कॉ रणजीत मुदिराज, बद्रीनाथ इंदेपवाड, मारोती सोनटक्के यांनी केली आहे. तपास शंकर चव्हाण हे करीत आहेत.

## मंगळवेढ्यात अनैतिक संबंधातुन दुहेरी हत्याकांड

### दिराने केली वहिनी आणि प्रियकराची हत्या



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१२, पंढरपूर :** अनैतिक संबंधातून दिराने भावजय आणि प्रियकराची हत्या केल्याची घटना मंगळवेढ्यात घडली आहे. मंगळवेढ्या तालुक्यातील गुंजेगाव ये ढोबळे वस्तीमध्ये हे दुहेरी हत्याकांड करण्यात आलं आहे. रिणा दादासाहेब ढोबळे (वय ४०) आणि तिचा प्रियकर चंद्रकांत तात्या पाटील हा वस्तीवर मुक्कामी राहायला आला होता.रिणा ढोबळे आणि चंद्रकांत तात्या पाटील एकाच ठिकाणी वस्तीला असल्याचे रिणाचे दीर लक्ष्मण ढोबळे याला कळालं, तेव्हा त्याने वस्तीवरील नातेवाईकांना गोळा केलं आणि रिणाच्या घरावर कुऱ्हाडीने हल्ला चढवला.

या हल्ल्यात दोघांच्या डोक्यावर वर्मी घाव बसल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला. रिणा ढोबळे ही मंगळवेढा तालुक्यातील गुंजेगावातील ढोबळे वस्तीची रहिवासी होती. तर चंद्रकांत पाटील हा सांगोला तालुक्यातील राजापूरचा रहिवासी होता. रिणा ढोबळेच्या पतीचे काही वर्षांपूर्वी निधन झाले होते, त्यानंतर रिणाच्या आयुष्यात चंद्रकांत पाटील आला होता. चंद्रकांत पाटील आणि रिणा वस्तीवर असल्याचं समजल्यानंतर दीर लक्ष्मण ढोबळे याचा राग अनावर झाला. यानंतर रिणाच्याच घरच्या लोकांनी तिला आणि तिच्या प्रियकराला संपवून अनैतिक संबंधांचा रक्तरंजित शेवट केला.

# वाढवण्यात ‘अवैध देशी दारू’ चा महापूर...



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.१२, उदगीर (लातूर) :** उदगीर तालुक्यातील वाढवणा बुद्रुक हे गाव सर्वात जास्त लोकसंख्येचे गाव असुन येथील असंख्य कुटुंब मोल मजुरी मिळेल ते काम करून आपला संसार चालवीणारे कुटूंब असुन गावात मिस्त्री काम, शेतीचे काम, करून मोलमजुरी करून आपल्या कुटूंबाचा गाडा चालवतात. मात्र, गावात घराघरात भर वस्तीत दुकानात ५-६ ठिकाणी अवैध देशी दारू चे दुकान असुन १८० मिलीची भिंगरी बाटली ९० रुपये तर १०० मिलीची बाटली ५० रुपये ला विक्री करीत आहेत. विना परवाना घरात दुकानात मेन रस्त्यावर भर वस्तीत दुकाने चालू असल्यामुळे २४ तास मागेल त्याला अवैध देशी दारू मिळत असल्यामुळे पिणारे लोक घराची संसाराची मुलाच्या मुलीच्या शिक्षणाची पर्वा न करता झोपीतून उठल्या उठल्या दारूच्या दुकानात जाऊन पीत असल्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर आलेत. अनेक जनाचे संसार उध्वस्त झाले. तर असंख्य महिला लहान वयातच विधवा झाली आहेत. अनेक जन कोवळ्या वयात लिव्हर खराब होऊन यमसदणी गेले आहेत. संबंधित पोलिसांना माहिती असुन देखील चिरी मिरी घेऊन नजर अंदाज करत असल्यामुळे ५ दुकान वाले बिल्डिंग बांधून बँक बॅलेन्स ठेवून खिशात हजारो रुपयेचा बंडल घेऊन फिरत आहेत. तर पिणारे मात्र कंगाल घरात खाण्यासाठी देखील काही आणुन देत नसल्यामुळे कुटूंबातील सदस्यांना उपाशी जिवन जगावे लागत आहेत तर काही जणांचे संसार उध्वस्त झाले आहेत.

जिल्हा पोलीस अधिक्षक व डीआयजीच्या आदेशानुसार जिल्हा पोलीस अधिक्षक व डीआयजी चे पथक धाडी घालत आहेत. मात्र, ह्या पथक येण्याची माहिती स्थानिक बिट जमादारस मिळत असल्याने ते अवैध धंदे वाल्याना मोबाईल द्वारे माहिती देत असल्यामुळे धंदे वाले दुकान व घराना कुलूप लावून पथक गेल्या पर्यंत दुकाने बंद ठेवून जात आहेत. पथक येऊन फिरून गेलेके खुले आम धंदे चालू होत आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक डीआयजीची धाक संबंधित बिट जमादारावर व धंदेवल्यावर राहिली नाही अशी चर्चा जोरात चालू असुन ज्या च्या बिट मध्ये अवैध धंदे चालू आहेत. अशा बिट जमादारावरच कार्यवाही केली पाहिजे तरच अवैध धंदे बंद होतील अशी चर्चा नागरिकातून होताना दिसत आहे. नियमानुसार २१ वर्षावरील व्यक्तीला दारू पिण्याचा परवाना ज्या व्यक्ती जवळ आहे. अशां व्यक्तींनाच दारू पिण्यास व बाटली द्यावायची आहे. मात्र इथे अल्पवयीन असो की तरुण सर्रास कुणाला पण दारू विक्री केली जात असल्यामुळे संसार उध्वस्त होत आहेत. कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक व डीआयजीनी जातीने लक्ष घालुन वाढवणा बुद्रुक येथील घरातून भरवस्तीतील दुकानातून विक्री करीत असलेल्या अवैध धंदेवाल्यावर कारवाई करून गोरगरीब कष्टकरी मजुरांच्या संसाराची होणारी राख रांगोळी थांबवावी असा टाहो महिला फोडत आहेत.